# राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
# बृहन्मुंबई खंडपीठ

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

## अपील क्र. MHSICMU/२०२२/M/०००३८२

**अपिलार्थी श्री. भास्कर रविभाई त्रिवेदी**
**विरुद्ध**
**जन माहिती अधिकारी तथा उप कुलसचिव**
महाविद्यालय संलग्नता व विकास विभाग
मुंबई विद्यापीठ, फोर्ट परिसर, एम.जी.रोड, मुंबई -४०० ०३२.

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा कुलसचिव**
प्रथम अपिलीय अधिकारी यांचे कार्यालय, रुम नं.१०८,
मुंबई विद्यापीठ, फोर्ट परिसर, एम.जी.रोड, मुंबई -४०० ०३२.

**द्वितीय अपील अर्ज सुनावणी दिनांक : २३.०४.२०२४**

| | | |
|---|---|---|
| अपीलकर्ता | : | उपस्थित |
| विद्यमान जन माहिती अधिकारी | : | उपस्थित |
| प्रथम अपिलीय अधिकारी | : | अनुपस्थित |

| मूळ अर्ज दिनांक | जन माहिती अधिकाऱ्याचा उत्तराचा दिनांक | प्रथम अपील दिनांक | प्रथम अपील आदेश दिनांक |
|---|---|---|---|
| १०.०८.२०२१ | २७.०८.२०२१ | २४.०९.२०२१ | १०.१२.२०२१ |

अपिलार्थी यांनी आयोगाकडे दि. ०४.०१.२०२२ रोजीच्या अर्जान्वये द्वितीय अपील दाखल केले आहे.

द्वितीय अपील अर्जासोबत अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांचे पत्र दि. २७.०८.२०२१ व प्रथम अपिलीय अधिकारी यांचे आदेश दि. १०.१२.२०२१ संलग्न केले आहेत.

अपिलार्थी यांनी त्यांचा माहिती अर्ज दि. १०.०८.२०२१ अन्वये उपनिबंधक, संलग्नता विभाग मुंबई विद्यापीठ यांनी राज्य माहिती आयोग बृहन्मुंबई यांना डॉ. भास्कर आर. त्रिवेदी यांच्या विरुध्द पाठविलेल्या दिनांक ०८.०२.२०२१ रोजीच्या पत्राचा विषय नमूद करुन सहा मुद्दयांमध्ये माहिती मागितली आहे.

जन माहिती अधिकारी यांनी त्यांचे पत्र दि. २७.०८.२०२१ अन्वये अपिलार्थी यांना पाच मुद्दयांवर माहिती दिली आहे व सहावा मुद्दा निरंक असल्याचे कळविले आहे.

अपिलार्थी यांनी दि. २४.०९.२०२१ रोजी दाखल केलेल्या प्रथम अपील अर्जावर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि. १०.१२.२०२१ रोजी जन माहिती अधिकारी यांनी सहाव्या मुद्दयाबाबत उपलब्ध माहिती अपिलार्थी यांना पुरवावी, असे आदेश पारीत करुन प्रथम अपील निकाली काढले आहे.

..२/-

सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी तथा उपनिबंधक, मुंबई विद्यापीठ हे उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी असे नमुद केले की, त्यांना मुद्दा क्रमांक ३, ४ व ५ ची माहिती मिळाली अहे. तथापि मुद्दा क्र. १, २ व ६ या तीन मुद्दयांची माहिती मिळालेली नाही. सहाव्या मुद्दयाची माहिती चुकीची दिलेली आहे.

जन माहिती अधिकारी यांनी असे नमुद केले की, अपिलार्थींनी सहा मुद्दयांमध्ये माहिती मागितली होती. सहाव्या मुद्दयामध्ये व्यवस्थापन परिषदेच्या ठरावाची प्रत अपिलार्थी यांना दिलेली आहे.

या अपिलासंदर्भातील कागदपत्रांचे अवलोकन केल्यावर तसेच युक्तिवाद ऐकून घेतल्यानंतर आयोग या निष्कर्षावर येत आहे की, दिनांक १०.१२.२०२१ रोजी प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अर्जदारास त्यांनी विचारलेल्या मुद्दा क्रमांक ६ बद्दलची माहिती देण्याचे आदेशीत केले होते. अपिलार्थी सुनावणीस उपस्थित असून त्यांचे म्हणणे आहे की, त्यांना मुद्दा क्रमांक १, २ व ६ ची माहिती प्राप्त झालेली नाही.

उप निबंधक तथा जन माहिती अधिकारी, मुंबई विद्यापीठ यांनी असे नमूद केले की, त्यांचे पत्रामध्ये नमूद केलेल्या उच्च न्यायालयाच्या आदेशाची प्रत संबंधितांस उपलब्ध करुन देण्यात आली आहे. तसेच सदर पत्रान्वये जन माहिती अधिकारी यांनी वस्तूस्थिती राज्य माहिती आयुक्त यांना कळविलेली आहे.

आयोग पुढील आदेश देत आहे:

## आदेश

**१. जन माहिती अधिकारी यांनी भास्कर त्रिवेदी अर्जदाराविरुद महिला विकास कक्ष यांनी केलेली चौकशी व्यवस्थापन परिषदेसमोर जर सादर करण्यात आली असेल तर व्यवस्थापन परिषदेचा ठराव अपिलार्थी यांना उपलब्ध करुन द्यावा व जर महिला विकास कक्षाकडे चौकशी सादर केली नसेल तर तशी स्पष्ट परिस्थिती अपिलार्थीना १५ दिवसांचे आत कळवावी.**

**२. अपील निकाली काढण्यात येत आहे.**

State Information Commission
Greater Mumbai

प्रदीप व्यास
23-4-2024

**मुंबई**
**दिनांक : २३.०४.२०२४**

**(डॉ. प्रदीप व्यास)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**